फोन नं. (02164) 272414, 8275706613
Web : http://gcekarad.ac.in
Email: principal@gcekarad.ac.in,
principal.gcekarad@dtemaharashtra.gov.in

**महाराष्ट्र शासन**

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,कराड

*(महाराष्ट्र शासनाची स्वायत संस्था)*

**विद्यानगर, कराड पिन – ४१५१२४ जि. सातारा**

जा.क्र.शाअक/विवि/२०२५-२०२६/ 2221.

दिनांक:- 7 JUL 2025

## सूचना अत्यंत महत्वाची (प्रत्यक्ष प्रवेश सन – २०२५-२६)

**विषय :-शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करीता व्दितीय वर्ष ते चतुर्थ वर्षाचे प्रवेश निश्चित करणे बाबत.**
**( बीटेक/एमसीए/एमटेक अभ्यासक्रमांकरीता )**

उपरोक्त विषयानुसार व्दितीय वर्ष ते चतुर्थ वर्ष सर्व वर्गांचे व शांखांचे विद्यार्थ्यांना कळविणेत येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करीता प्रवेश हे **ऑनलाईन पध्दतीने फी भरुन निश्चित करावयाचे आहेत.** प्रवेशावेळी भरावयाच्या प्रवेश शुल्काबाबतची सर्व माहिती आपल्या महाविद्यालयाचे वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तरी सर्व सबंधीत प्रवेशासाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी खालील निर्देशित केलेल्या दिनांकास आपला प्रवेश अर्ज भरुन आवश्यक त्या कागदपत्रांसहित भरुन घ्यावा. आणि विद्यार्थी विभागाकडून प्रवेश शुल्क निश्चित करुन घ्यावे. व ऑनलाईन पध्दतीने प्रवेश शुल्क भरावे, तसेच भरलेल्या शुल्काची पावती जनरेट करुन सदर पावतीच्या छायाप्रतींसह **प्रवेश अर्ज प्रत्यक्ष महाविद्यालयात विद्यार्थी विभागात जमा करावयाचे आहेत.**

**तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रथम वर्ष, थेट व्दितीय वर्ष बी. टेक., प्रथम वर्ष एम. टेक., व एमसीए अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या सर्व शाखांचे विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे परिपत्रक क्रमांक जा.क्र.शिवाजी वि/पात्रता/२९ दि.१६/०६/२०२५ नुसार पात्रता शुल्का मध्ये वाढ झाल्यामुळे पात्रता शुल्काच्या फरकाची रक्कम रुपये २००/- (रुपये दोनश फक्त) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनाभरणा करणे आवश्यक असल्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांनी Q-fix व्दारे रक्कम रुपये २००/- भरणा करुन पावती प्रवेश अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे. प्रवेश अर्ज आपल्या महाविद्यालयाचे वेबसाईटवर उपलब्ध आहेत.**

**प्रत्यक्ष प्रवेश अर्ज जमा करतानां प्रवेश अर्जासोबत खालील प्रमाणे कागदपत्रके जोडावीत.**

१. सर्व मागील वर्गांच्या गुणपत्रिकां २. जातीचा दाखला ३. जात वैधता प्रमाणपत्र ४.तहसिलदार यांचा उत्पन्नाचा दाखला /नॉनक्रिमीलेअर (जे लागू असेल ते) प्रती जोडाव्यात. ५. मागील सर्व वर्गांचे प्रवेश शुल्क भरलेल्या पावत्यांच्या झेरॉक्स प्रती

| अ.क्र. | वर्ग व शाखा | प्रवेश निश्चित करावयाचा कालावधी |
|---|---|---|
| १ | बी-टेक – चतुर्थ वर्ष सर्व शाखा | दिनांक १४/०७/२०२५<br>सकाळी – ११.०० ते सायंकाळी ०५.३० पर्यंत |
| २ | बी-टेक – तृतीय वर्ष सर्व शाखा | |
| ३ | एमसीए- व्दितीय वर्ष | दिनांक १५/०७/२०२५<br>सकाळी – ११.०० ते सायंकाळी ०५.३० पर्यंत |
| ४ | एम.टेक- व्दितीय वर्ष सर्व शाखा | |
| ५ | बी-टेक – व्दितीय वर्ष सर्व शाखा | |

**तरी सर्व विद्यार्थ्यांनी उपरोक्त दिनांकास ऑनलाईन पध्दतीने प्रवेश शुल्क जमा करुन आपला प्रवेश निश्चित करुन घ्यावा.**

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड

प्रत- १.सर्व विभाग प्रमुखांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
२.महाविद्यालयाचे वेबसाईटवर प्रदर्शित करणे करीता
३.मा. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय कराड यांना माहितीसाठी.